लोकमत

# एआरएआय, एनसीएल यांच्यात सामंजस्य करार

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : इलेक्ट्रिक मोबिलिटी असलेल्या वाहनांची संख्या वाढवणे काळाची गरज आहे. भविष्यात येऊ घातलेल्या या इलेक्ट्रिक गाड्यांमध्ये बॅटरी हा अत्यंत महत्त्वाचा घटक असणार आहे. त्यामुळे वाहन उद्योगासाठी लागणाऱ्या सुयोग्य अशा बॅटरी विकसित करीत त्याचे एकत्रित संशोधन गतिमान करण्याच्या उद्देशाने दि ऑटोमोटिव्ह रीसर्च असोसिएशन ऑफ इंडिया अर्थात एआरएआय आणि राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा म्हणजेच एनसीएल यांमध्ये नुकताच सामंजस्य करार करण्यात आला.

एआरएआयच्या संचालिका रश्मी उर्ध्वरेषे आणि एनसीएलचे संचालक प्रा. अश्विनी कुमार नांगिया यांनी आज एआरएआयमध्ये झालेल्या एका कार्यक्रमात या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. एआरएआयचे वरिष्ठ उपसंचालक व टेक्नोलॉजी ग्रुपचे प्रमुख एम. आर. सराफ, एनसीएलच्या वरिष्ठ संशोधक डॉ. मंजूषा शेळके या वेळी उपस्थित होते आणि या वेळी त्यांनी उपस्थितांना वर नमूद क्षेत्रात आपापल्या संस्था काय काम करीत आहेत, याविषयीचे सादरीकरण केले.

रश्मी उर्ध्वरेषे म्हणाल्या, 'इलेक्ट्रिक वाहनांच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या जास्त क्षमतेच्या, कार्यक्षम, आकारमानाने कमी आणि वजनाने हलक्या असलेल्या बॅटरी विकसित करण्यासाठी त्यावर होत असलेल्या संशोधनाला गतिमान करण्याची गरज आहे. हेच लक्षात घेत एआरएआय आणि एनसीएल या दोन संस्थांनी एकत्र येऊन काम करण्याचे ठरविले. ज्यामध्ये मूलभूत सामग्री संशोधन (फंडामेंटल मटेरियल रिसर्च) क्षेत्रात असलेली एनसीएलची ताकद तर एआरएआयला असलेले वाहन उद्योगाशी संबंधित तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि याविषयीचा असलेला प्रदीर्घ अनुभव यांचा मेळ घातल्यास हे सहज शक्य होईल, असा आमचा विश्वास आहे.'